निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २२० वा.
सोमवार -१३ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## यावर्षी पवार कुटुंब बारामतीत दिवाळी साजरी करणार नाही?

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई (प्रतिनिधी)** दरवर्षी मोठ्या उत्साहात पवार कुटुंब बारामतीत दिवाळी सण साजरा करत असते. पण यावर्षी बारामतीमध्ये पवार कुटुंबीयांकडे दिवाळी पाडवा साजरा होणार नाही.दरवर्षी मोठ्या उत्साहात पवार कुटुंब बारामतीत दिवाळी सण साजरा करत असते. या सणाच्या दिवशी पवार कुटुंबातील सर्व व्यक्ती एकत्र येत असतात. पण यावर्षी बारामतीमध्ये पवार कुटुंबीयांकडे दिवाळी पाडवा साजरा होणार नाही. कारण, या वर्षी शरद पवार यांचे बंधू प्रतापराव पवार यांच्या पत्नी भारती प्रतापराव पवार यांचं निधन झालं आहे. त्यामुळे पवार कुटुंबीयांनी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. शरद पवार आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयांनी यंदा दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. या वर्षी प्रतापराव पवार यांच्या पत्नी भारती पवार यांचं निधन झाल्यामुळे पवार कुटुंबीयांनी दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे.

बारामतीत दरवर्षी पवारांचा दिवाळी पाडवा हा मोठ्या जल्लोषात साजरा होत असतो. या पाडव्याचं कुतूहल राज्याच्या कानाकोपऱ्यासह देशभरातील पवार प्रेमींमध्ये असते. या पाडव्याला पवारांना भेटण्यासाठी राज्यभरातून विविध राजकीय पक्षातील आमदार, खासदार यांच्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातील नागरिक बारामतीकडे पवारांना शुभेच्छा देण्यासाठी येत असतात. मात्र यंदाचा पाडवा होणार की नाही? याबाबत खासदार सुप्रिया सुळे यांनी साशंकता व्यक्त केली होती. अशातच दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय पवार



कुटुंबाने घेतला आहे. दरवर्षी बारामतीच्या गोविंद बागेत पवारांचा दिवाळी पाडवा संपन्न होत असतो. मात्र, गेल्या वर्षीचा दिवाळी पाडवा हा राजकीय वर्तुळातील चर्चेचा विषय झाला होता. कारण पक्ष आणि कुटुंबात फूट पडल्यानंतर पवारांच्या पाडव्यामध्येही फूट पडल्याचा पाहायला मिळालं होतं. शरद पवारांचा पाडवा गोविंदबागेत तर अजित पवारांचा पाडवा काटेवाडीत साजरा झाला. त्यामुळं नात्यानंतर सणातही फूट पडल्याचे दिसून आले होते. शरद पवारांना भेटण्यासाठी गोविंद बागेत मोठ्या संख्येनं कार्यकर्ते आले होते. तर अजित पवारांना भेटण्यासाठी देखील कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. अजित पवार त्यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार, अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार, जय पवार कार्यकर्त्यांच्या शुभेच्छांचा स्विकार केला होता.

## बिहारमध्ये NDA चे जागावाटप ठरलं

### भाजप आणि नितीश कुमार समसमान जागा लढवणार, कुणाला किती जागा?

**आत्ताच एक्सप्रेस**

**बिहार/ वृत्तसेवा/** बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. भाजप आणि जनता दल युनायटेड प्रत्येकी १०१ जागांवर उमेदवार उतरवणार आहेत. तर चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पक्षाला २९ जागा देण्यात आल्या आहेत. याशिवाय, जीतन राम मांझी यांच्या हिंदुस्तानी अवाम मोर्चाला आणि राष्ट्रीय लोक मोर्चाला प्रत्येकी ६ जागा मिळाल्या आहेत.भाजपचे बिहार प्रभारी विनोद तावडे यांनी सांगितले की, एनडीएतील सर्व घटकांनी परस्पर सहमती आणि मैत्रीपूर्ण वातावरणात जागांचे वितरण पूर्ण केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत एकजुटीने लढण्याचा निर्धार एनडीएने केला आहे.

जागावाटपाचा तपशील
भाजप (BJP) - १०१ जागा
जदयू (JDU) - १०१ जागा
लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) - २९ जागा
राष्ट्रीय लोक मोर्चा - ६ जागा
हिंदुस्तानी अवाम मोर्चा - ६ जागा

सौहार्दपूर्ण चर्चेनंतर निर्णय

एनडीएच्या नेत्यांनी सांगितले की, बिहारमधील आगामी निवडणुकीसाठी ही वाटणी परस्पर विश्वास आणि सन्मानाच्या वातावरणात करण्यात आली. तावडे यांनी स्पष्ट केले की, आम्ही एकत्रितपणे निवडणुकीत उतरून विकासाचा मुद्दा जनतेपर्यंत पोहोचवू.

बिहारचे पक्षीय बलाबल
एकूण सदस्यसंख्या - २४३
राष्ट्रीय जनता दल - ७९
भारतीय जनता पक्ष (BJP) - ७८
जनता दल (युनायटेड) - - ४५
काँग्रेस (Congress) - १९
CPI (Marxist-Leninist) Liberation - १२
हिंदुस्तानी अवाम मोर्चा - ४
CPI - 2
CPI (M²) - 2
-IMIM² - 1
अपक्ष आमदार - १

बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान



केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केल्यानुसार, बिहारमध्ये २४३ जागांसाठी दोन टप्प्यात मतदान पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात १२१ जागांसाठी मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबरला होणार आहे.बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याचं मतदान ११ नोव्हेंबरला होणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील मतदान १२२ जागांवर होणार आहे. तर, मतमोजणी १४ नोव्हेंबरला होणार आहे.

**बिहार निवडणुकीतील एनडीएची रणनीती**

भाजप आणि जदयू या दोन प्रमुख पक्षांनी पुन्हा एकदा एकत्र येत मतदारसंघनिहाय रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

चिराग पासवान यांच्या पक्षालाही या वेळेस महत्त्वपूर्ण वाटा देऊन एनडीएने छोट्या पक्षांनाही आपल्यात सामावून घेतलं आहे.

## महात्मा फुले रात्रशाळेचे प्रवर्तक - डॉ. रामदास भोंग

### मुक्त विद्यापीठ सावित्राबाई फुले अध्यासनातर्फे मालेगाव नाईट कॉलेजमध्ये व्याख्यान संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि आर्ट्स कॉमर्स सायन्स नाईट कॉलेज, मालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांचे शिक्षण विषयक कार्य' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. मालेगाव येथील नाईट कॉलेजमध्ये झालेल्या या कार्यक्रमास मुक्त विद्यापीठाच्या सावित्रीबाई फुले अध्यासनाचे प्रमुख डॉ. रामदास भोंग प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. अध्यक्षस्थानी श्री. पद्माकर इंगळे होते.

आपल्या व्याख्यानात डॉ. भोंग म्हणाले की महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८५५ मध्ये पुण्यात सुरू केलेली कामगार कष्टकऱ्यांसाठीची पहिली रात्र शाळा ही एक शैक्षणिक व सामाजिक क्रांती होती, ज्यामुळे महात्मा फुले हे भारतातील




कामगार कष्टकऱ्यांच्या रात्र शाळेचे प्रवर्तक ठरतात. ते पुढे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांनी केवळ मुलींच्या शिक्षणासाठीच नव्हे तर कामगार, शेतमजूर अशा समाजातील सर्व स्तरातील व शेवटचा घटक असलेल्यांची शिक्षणाची सोय केली. याच कार्यामुळे आजही भारतातील कामगार कष्टकऱ्यांना शिक्षण घेऊन आपले भविष्य उज्वल करण्याची संधी मिळते. अध्यक्षपदावरून बोलतांना श्री. पद्माकर इंगळे यांनी देखील फुले दाम्पत्य व श्रीमती फातिमा शेख यांच्या कार्याचा गौरव केला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. झुलेखा अन्सारी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. तौसीफ खान यांनी केले तर श्रीमती रेहाना अन्सारी यांनी आभारप्रदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई येथे बुद्धगया येथील महाबोधी विहार मुक्ती महामोर्चाच्या पूर्व तयारीसाठी केज येथे सर्वपक्षीय बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/प्रतिनिधी/**बुद्धगया येथील महाबोधी बुद्धविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे. यासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सर्वपक्षीय धम्म बांधवांचा महामोर्चा आयोजित केला आहे. त्या निमित्त केज तालुक्यातील सर्व धम्म बांधवांची बैठक संपन्न झाली.बुद्धगया येथील महाबोधी विहार हे बौद्ध अनुयायांच्या ताब्यात देण्यात यावे आणि समितीमध्ये असलेल्या गैर धर्मीय सदस्यांना हटवण्यात मागणीसाठी की, १४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता आझाद मैदान, मुंबई येथे सर्व पक्षीय महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन करण्यात येणार आहे.

त्या आंदोलनाच्या तयारीसाठी आणि केज तालुक्यातून जास्तीत जास्त बौद्ध अनुयायांनी सहभागी होण्यासाठी दि. ९ ऑक्टोबर रोजी २:०० वाजता केज तालुक्यातील सर्व बौद्ध अनुयायांची बैठक शासकीय विश्रामगृह केज येथे बैठक संपन्न झाली. बैठकीचे निमंत्रक दीपक भाऊ कांबळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीला नगराध्यक्ष सौ. सीताताई बनसोड, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खरात, रवींद्र जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते लखन हजारे, अशोक गायकवाड, पत्रकार गौतम बचुटे, पत्रकार तात्या गवळी, विवेक बनसोड, किरण जोगदंड, राहुल इनकर, ज्येष्ठ नेते दिलीप बनसोडे,माजी नगरसेवक कपिल मस्के, अशोक सरवदे, सुरज काळे,



रणजित कांबळे, प्रदीप गायकवाड, शेखर सिरसट, राहुल वाव्हळ, जोगदंड सर, श्रावण वाघमारे, मिठ्ठू सरवदे, करण हजारे यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी बौद्ध बांधव आणि कार्यकर्त्यांनी केज तालुक्यातील जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्याचे आवाहन उपस्थितांनी केले. तसेच या आंदोलनात सहभागी होण्यासाठी गावागावात कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक, सामाजिक समानतेची स्वप्नपूर्ती व्हावी - सरन्यायाधीश भूषण गवई

**आत्ताच एक्सप्रेस**

**रत्नागिरी (प्रतिनिधी)** मंडणगड येथे झालेल्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीमधून समाजाच्या शेवटच्या नागरिकाला कमीत कमी वेळेत कमीत कमी खर्चात न्याय मिळेल, या दृष्टीने आपण सर्वजण प्रयत्नशील रहाल. जेणेकरुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक आणि आर्थिक समानतेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी अपेक्षा सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी व्यक्त केली.मंडणगड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री डॉ. उदय सामंत, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, पालक न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे, महसूल राज्यमंत्री योगेश कदम, प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विनोद जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमृता जोशी, बार असोसिएशनचे अध्यक्ष अमोल सावंत, सदस्य संग्राम देसाई, वकील संघाचे अध्यक्ष मिलींद लोखंडे, आमदार किरण सामंत, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे, जिल्हाधिकारी मनुज जिंदल आदी उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते कळ दाबून न्यायालय इमारत प्रांगणातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे तसेच म्युरलचे अनावरण करण्यात आले. यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. न्यायदान कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश श्रीमती जोशी यांना आसनावर विराजमान करण्यात आले. येथील ग्रंथालयाचेही उद्घाटन आणि पाहणी सरन्यायाधीशांनी यावेळी केली.यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हायस्कूलच्या प्रांगणात झालेल्या समारंभात मार्गदर्शन करताना सरन्यायाधीश गवई म्हणाले, आजचा महत्त्वाचा आणि ऐतिहासिक क्षण आहे. न्यायमूर्ती म्हणून मला २२ वर्षे पूर्ण झाली आहेत. कोल्हापूर खंडपीठाचे उद्घाटन आणि आजच्या मंडणगड न्यायालयाच्या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्यक्रम माझ्या २२ वर्षाच्या सेवेमधील महत्त्वाचे आहेत. अतिशय कमी वेळेत मंडणगड येथे न्यायालय सुरु करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मंडणगड न्यायालयाच्या भूमिपूजनाला आम्ही दोघे उपस्थित होतो आणि आजच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमालाही आम्ही दोघे उपस्थित आहोत. हा गौरवाचा क्षण आहे. महाराष्ट्र शासन विशेषत: विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मी आभार मानतो, त्यांनी मला या इमारतीच्या उद्घाटनाची संधी दिली.

अवघ्या २० दिवसात कोल्हापूर येथील जुन्या इमारतीचा कायापालट करुन खंडपीठ सुरु केले. नाशिक, नागपूर, मंडणगड येथील इमारती पहा. विविध तालुक्यातील न्यायालयांच्या इमारती, माझ्या दर्यापूर तालुक्यातील इमारत पहा. मी अभिमानाने सांगू शकतो, देशातील कुठल्याही तालुक्यामध्ये अशा तऱ्हेची न्यायालये असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती देशातल्या कुठल्याही तालुक्यात असणार नाहीत. एवढ्या सुंदर इमारती महाराष्ट्र शासनाने उभ्या केल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ८ ऑक्टोबर २०२३ रोजी सरन्यायाधीश गवई आणि मी या न्यायालयाचे भूमिपूजन केले. दोन वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशय सुंदर इमारत उभी केली आहे. कोल्हापूरचे खंडपीठ झाले, सरन्यायाधीश गवईंच्या नेतृत्वात आणि सल्ल्याने हा प्रवास २०१४ पासून सुरु झाला. न्यायालय आणि राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून ते लक्ष देत आहेत. सातत्याने त्यांचे लक्ष राहीले होते. २०१४ ते २०२५ पर्यंत जवळपास दीडशे न्यायालये आणि इमारतींना मान्यता दिली आणि त्याचे काम सुरु केले. त्यातील अनेक इमारती पूर्ण केल्या आहेत. याचे श्रेय सरन्यायाधीश गवई यांना जाते. सातत्याने राज्य शासनाबरोबर संवाद करुन आणि त्यातील अडचणी दूर करुन आमच्याकडून या सगळ्या गोष्टी करवून घेतल्या. मी वकील असल्यामुळे उपमुख्यमंत्री असताना विधी व न्याय हा विभाग माझ्याकडे मागून घेतला होता. उपमुख्यमंत्री शिंदे हे मुख्यमंत्री असताना २९ वेगवेगळ्या न्यायलयीन पायाभूत



सुविधांना मान्यता दिली.

चिपळूण न्यायालय इमारतीची केलेली मागणी तत्काळ मंजूर करु. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंबडवे येथील स्मारकाच्या आराखड्याला वेग देण्याचे काम करु, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मंडणगडचे न्यायालय हे अतिशय महत्त्वाचे आहे. या न्यायालयामुळे चार-साडेचार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती ठिकाण असणार आहे. यामुळे लोकांचा प्रवास, पैसा वाचणार आहे. ही केवळ इमारत नसून, लोकांकरिता न्यायदानाची एक गतीशील व्यवस्था तयार झाली आहे. याचे शंभर टक्के श्रेय सरन्यायाधीश गवई यांचे आहे. प्रलंबित खटले वेगांनी निकाली निघतील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला सुंदर संविधान दिले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला संधीची समानता देखील आहे आणि प्रत्येकाला न्याय देखील आहे. राज्य शासन म्हणून ही जबाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडू, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, वंचिताना न्याय देण्यासाठी महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्य वेचले, त्यांचा पुर्णाकृती पुतळा या न्यायालयात आहे. न्यायाचे हे मंदिर आहे, घटनेचे मंदिर आहे. याची जाणीव हा पुतळा करुन देईल. या इमारतीचे भूमिपूजन आणि उद्घाटन देखील सरन्यायाधीशांच्या हस्ते झाले. यातून शासन विशेषत: सार्वजनिक बांधकाम विभाग सक्षम असल्याचे दाखवून दिले आहे. समाजातील शेवटच्या घटकातील माणसाला न्याय मिळाला पाहिजे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संकल्पना होती. आज या इमारतीसाठी काम करणाऱ्या कामगांराचा सरन्यायाधीशांच्या हस्ते सत्कार करुन ती पूर्ण झाली आहे. न्याय गावा-गावांमध्ये मिळाला पाहिजे, ही दूरदृष्टी सरन्यायाधीशांची आहे. सर्वसामान्यांमधले असामान्य कर्तृत्ववान व्यक्तीमत्त्व आणि भारतीय न्यायव्यवस्थेचे ते भूषण आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय पोहचविण्याचे काम न्यायालय करत असतं. म्हणून न्यायालयांना देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये आम्ही काटकसर करत नाही. या मंदिरातून सर्वसामान्यांना न्याय मिळून खटले लवकर निकाली निघतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.पालकमंत्री डॉ. सामंत म्हणाले, ४० हजार लोकवस्तीच्या गावात दिवाणी व फौजदारी न्यायालय असणारे देशात एकमेव मंडणगड असावे. खेड येथे सेशन कोर्टाला नवीन न्यायालय बांधावे, चिपळूण न्यायालयासाठीचा प्रस्ताव पाठवला आहे, त्यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा. आंबडवे गावच्या स्मारकाचा आराखडा तयार झाला आहे. तो पूर्ण करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, न्यायमूर्ती कर्णिक यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. पालक न्यायमूर्ती जामदार यांनी प्रास्ताविक केले. वकील संघाचे अध्यक्ष लोखंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, संविधान उद्देशिका आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास वकील, पक्षकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत.

## देगलूर महाविद्यालयाची विद्यापीठीय व्हॉलीबॉल स्पर्धेत द्वितीय पारितोषिक

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर/ प्रतिनिधी**/स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड व इंदिरा गांधी महाविद्यालय, नांदेड येथे दि.०९/१०/२५ रोजी आयोजित आंतर महाविद्यालयीन विद्यापीठीय व्हॉलीबॉल पुरुष स्पर्धेत देगलूर महाविद्यालयातील खेळाडू तुकाराम मट्टमवार, योगेश येरकलवार,पवन रघुपतिवार,शुभम मारबत्ते या खेळाडुंनी ब विभाग व्हॉलीबॉल संघात प्रतिनिधित्व करत विद्यापीठातून द्वितीय क्रमांक प्राप्त केले आहे.या ब विभागीय विद्यापीठय संघांचे प्रशिक्षक म्हणून डॉ.निरज उपलंचवार असून या खेळाडूंनी देगलूर महाविद्यालयाचे नाव विद्यापीठीय स्तरावरावर नाव लौकीक केले आहे.या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे,सूर्यकांत नारलावार,गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार,गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ,उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार,उपप्राचार्य प्रा. चमकुडे एम.एम. उपप्राचार्य डॉ.शेरिकर व्ही. जी.,पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक,कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

# धर्मांतर घोषणा वर्धापनदिन : सामाजिक परिवर्तनाचा क्रांतिकारी प्रवास

१३ ऑक्टोबर हा दिवस भारतीय सामाजिक इतिहासात एका विलक्षण क्रांतीचा साक्षीदार आहे. १९३५ मध्ये १३ ऑक्टोबर या दिवशी येवला (जिल्हा नाशिक) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मी हिंदू धर्म सोडणार आहे अशी घोषणा करून एका अशा ऐतिहासिक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली, ज्याने भारतीय समाजाच्या रचनेला आणि विचारविश्वाला नवा आकार दिला. म्हणूनच हा दिवस 'धर्मांतर घोषणा वर्धापनदिन' म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. तो फक्त एका धार्मिक निर्णयाचा दिवस नाही, तर भारतीय समाजाच्या आत्ममुक्तीचा, सन्मानाच्या जागृतीचा आणि मानवी स्वातंत्र्याच्या उद्घोषाचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवन हे अन्याय, अस्पृश्यता आणि जातीय अत्याचारांविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक होते. ते केवळ कायदेतज्ज्ञ नव्हते; ते एक चिंतनशील क्रांतिकारक, समाजशास्त्रज्ञ आणि मानवतावादी होते. त्यांनी ज्या समाजात जन्म घेतला, त्या समाजाने त्यांना अस्पृश्यतेच्या विळख्यात ढकलले होते, पण त्यांनी त्या विषमतेवर मात करून संपूर्ण मानवजातीला जागवणारा विचार दिला. जात ही धर्माची देणगी नाही, आणि धर्म जर विषमता शिकवत असेल, तर असा धर्म माणसाचा शत्रू आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. या विचाराची सर्वात ठोस अभिव्यक्ती म्हणजे त्यांची धर्मांतर घोषणा होय. १९३५ साली झालेल्या येवला येथील त्या परिषदेला हजारो लोक उपस्थित होते. बाबासाहेबांनी त्या दिवशी जाहीर केलं की 'मी हिंदू धर्माचा जन्माने आहे, पण मृत्यूने नाही.' ही घोषणा केवळ वैयक्तिक नकार नव्हती, तर संपूर्ण सामाजिक क्रांतीचा प्रारंभबिंदू होती. त्यांनी हिंदू धर्माच्या चौकटीत सुधारणा शक्य नाही, हे ओळखले होते. त्या काळात त्यांनी म्हटले होते की, 'आपण या धर्मात राहिलो, तर आपल्याला कधीच समानता आणि सन्मान मिळणार नाही. त्यामुळे आपल्याला हा धर्म सोडून जाणे भाग आहे.' त्या घोषणेने भारतीय समाजात एक गडगडाट केला. उच्चवर्णीय धार्मिक शक्ती हादरल्या, आणि दलित समाजात एक नवसंजीवनी निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली, पण ते कोणत्या धर्मात जाणार हे त्या वेळी निश्चित केले नव्हते. कारण त्यांच्यासाठी धर्म बदलणे म्हणजे श्रद्धा बदलणे नव्हते; ते एक विचारांतर होते, अन्यायाच्या प्रणालीपासून मुक्त होण्याची प्रक्रिया होती. पुढील दोन दशकांत त्यांनी ख्रिश्चन, इस्लाम, शीख, बुद्ध, इत्यादी धर्मांचा सखोल अभ्यास केला. त्यांना असा धर्म हवा होता जो माणसाला समानतेने वागवेल, बुद्धीला स्वातंत्र्य देईल आणि जीवनात नैतिकतेचा अधिष्ठान देईल. अखेरीस त्यांनी बौद्ध धम्माची निवड केली, कारण बुद्ध धम्मात तर्क, करुणा, समता आणि अहिंसा ही मूल्ये होती, जी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णतः जुळणारी होती. पण १९३५ ची ती घोषणा हेच खरे टर्निंग पॉइंट ठरले. त्या दिवशी त्यांनी दलित समाजाला जागवले की गुलामी ही केवळ सामाजिक किंवा आर्थिक नाही, ती मानसिक आहे, आणि त्या मानसिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी धर्मांतर हे आवश्यक आहे. धर्मांतर म्हणजे नव्या समाजरचनेची पायाभरणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्माला एक सामाजिक संस्था म्हणून पाहिले. त्यांच्या मते, धर्म जर मानवी मूल्यांना तोडत असेल, तर तो समाज नष्ट करतो. म्हणून त्यांनी धर्मांतराला सामाजिक सुधारणा म्हणून मांडले, आणि त्यामुळे ही चळवळ धार्मिक स्वरूपाची असली तरी तिचा मूळ गाभा हा सामाजिक न्याय आणि मानवमुक्ती होता. १३ ऑक्टोबरची ती घोषणा झाल्यानंतर भारतातील दलित, शोषित, वंचित वर्गात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. लोकांना आपल्या दुःखाचे मूळ धर्मातील विषमतेत असल्याचे उमगले. हजारो कार्यकर्त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार सुरू केला. त्यांच्या या विचारसरणीला अनेकांनी धार्मिक विरोधही केला, पण सामाजिक परिणाम मोठे झाले. हिंदू धर्मातील सुधारकांना जातीसंस्थेवर विचार करावा लागला. देशभरात समता, बंधुता, आणि धार्मिक स्वातंत्र्यावरील चर्चा सुरू झाल्या. हे सर्व त्या एका घोषणेचे सामाजिक परिणाम होते.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी अखेर बाबासाहेबांनी नागपूर येथे दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. त्या दिवशी त्यांनी मी बौद्ध धर्म स्वीकारतो असे म्हणताना समाजाला नव्या युगात नेले. हे धर्मांतर केवळ धार्मिक नसून, तो एक सांस्कृतिक आणि नैतिक पुनर्जन्म होता. धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून आजही १४ ऑक्टोबर साजरा केला जातो, पण त्याची बीजे १३ ऑक्टोबर १९३५ च्या घोषणेतच पेरली गेली होती. म्हणूनच १३ ऑक्टोबरचा दिवस हा भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. या घोषणेने धर्म आणि समाज यांच्यातील नाते पुन्हा परिभाषित केले. धर्म हा माणसासाठी असावा, समाजाच्या शोषणासाठी नव्हे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दाखवले. त्यांनी धर्मांतराच्या माध्यमातून मानवधर्म या संकल्पनेचा उदय घडवला. त्यांच्या मते, खरा धर्म तोच जो माणसाला विचार करण्याचे स्वातंत्र्य देतो, स्त्री-पुरुष समानतेचा आदर करतो, आणि अहिंसेच्या मार्गाने समाजात न्याय निर्माण करतो. बौद्ध धम्माने हे सर्व मूल्ये दिली, आणि म्हणून त्यांनी तो स्वीकारला. धर्मांतर म्हणजे नव्या जीवनाचा मार्ग, नव्या मूल्यांचा अंगीकार, आणि नव्या सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्प होय.

आज ८९-९० वर्षांनंतरही त्या घोषणेचे महत्त्व कमी झालेले नाही. भारतीय समाज अजूनही जात, धर्म, आणि वर्ण यांच्या भिंतींमध्ये अडकलेला दिसतो. सामाजिक न्यायाची लढाई अजून अपूर्ण आहे. अनेक ठिकाणी दलितांवर अत्याचार, अस्पृश्यतेचे प्रकार, धार्मिक द्वेष, आणि विषमता कायम आहे. या पार्श्वभूमीवर धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करण्यास भाग पाडतो की आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्या संदेशापासून किती दूर गेलो आहोत? धर्मांतर घोषणा म्हणजे फक्त धार्मिक पातळीवरील बदल नव्हता, तो मानसिक आणि सामाजिक परिवर्तनाचा शंखनाद होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात धर्म म्हणजे मानवकल्याणासाठी असलेली नैतिक व्यवस्था. त्यांनी धर्माला शोषणाचे साधन नव्हे, तर परिवर्तनाचे साधन बनवले. म्हणूनच हा दिवस स्मरण करून देतो की खरी क्रांती मनात घडते, धर्म बदलला तरी जर विचार बदलला नाही, तर समाज बदलणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणूनच सांगितले होते, मी धर्म बदलतोय, पण माझे उद्दिष्ट माणूस बदलणे आहे.

या घोषणेनंतर बौद्ध चळवळ महाराष्ट्रात आणि भारतभर फोफावली. लाखो लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला, शिक्षण, जागृती आणि आत्मसन्मान यांचा स्वीकार केला. पण आंबेडकरांची अपेक्षा केवळ धर्मांतरापुरती नव्हती; ती होती विचारांतराची. आज आपल्याला त्या विचारांतराला नव्या पिढीपर्यंत पोहोचवायचं आहे. बौद्ध धर्मातील त्रिशरण आणि पंचशील ही तत्त्वे, बुद्ध, धम्म आणि संघात शरण जाणे; हत्या, चोरी, असत्य, व्यभिचार, आणि मद्यत्याग टाळणे ही केवळ धार्मिक नियम नसून मानवी आचरणाचे मार्गदर्शक आहेत. आंबेडकरांनी हे सामाजिक नैतिकतेचे शास्त्र म्हणून स्वीकारले. धर्मांतर घोषणा वर्धापनदिन साजरा करणे म्हणजे त्या घोषणेच्या भावनेचे पुनरुज्जीवन करणे. या दिवशी देशभरात येवला आणि नागपूर येथे लाखो अनुयायी जमून त्या घोषणेची आठवण करतात. आजच्या काळात धर्मांतर हा शब्द अनेकदा वादग्रस्त ठरतो. काही ठिकाणी राजकीय हेतूने या विषयाचा गैरवापर केला जातो. पण आंबेडकरांचे धर्मांतर हे कुठल्याही धार्मिक प्रलोभनामुळे नव्हते; ते बौद्धिक आणि नैतिक निर्णय होते. त्यांनी धर्मांतराला वैचारिक मुक्तीचा मार्ग बनवला. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने धर्मांतर म्हणजे मनुष्याच्या आत्मसन्मानाचा पुनर्जन्म होय. म्हणूनच धर्मांतर घोषणा वर्धापनदिन हा दिवस आपण माणूसपणाचा उत्सव म्हणून साजरा केला पाहिजे.

आज देशात आणि जगात असहिष्णुतेचे, धार्मिक द्वेषाचे वातावरण वाढत आहे. अशा वेळी डॉ. आंबेडकरांची धर्मांतर घोषणा आपल्याला पुन्हा मानवतेचा धर्म शिकवते. ती सांगते की धर्म जर विभाजन निर्माण करत असेल, तर तो धर्म नाही; जो एकता आणि करुणा निर्माण करतो, तोच खरा धर्म आहे. धर्मांतर घोषणा म्हणजे विभाजन नव्हे, तर एकात्मतेचा नव्या स्वरूपातील प्रयत्न आहे. ती व्यक्तीला विचारशील बनवते, आणि समाजाला समतेकडे नेते. आजच्या पिढीसमोर नवे प्रश्न आहेत, धर्माच्या नावावर हिंसा, राजकारणातील द्वेष, जातीय गटबाजी, आर्थिक विषमता, स्त्रीविषयक असमानता. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून आंबेडकरांनी दिलेला मार्ग अजूनही तितकाच प्रभावी आहे: शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. धर्मांतर घोषणा वर्धापनदिन आपल्याला आठवण करून देतो की या संघर्षाची दिशा केवळ राजकीय नाही, ती मानसिक आणि नैतिक असली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या जीवनात समतेची, करुणेची आणि न्यायाची मूल्ये अंगीकारली, तर खरी धम्मक्रांती घडेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# शेतकऱ्यांना कर्जमाफीचा नाद;म्हणणाऱ्या सहकारमंत्री यांच्या मुसक्या राज्यपालांनी आवराव्या!

महाराष्ट्राचे राजकारण आज कुठे पोहचले आहे!याची लाज वाटावी अशी परिस्थिती झाली आहे.एरवी या भुमित आपल्याला सौजन्यशिल, मृदू, प्रगल्भ भाषेसाठी राज्याची देशात चांगलीच ओळख होती.परंतु सन्मानजनक भाषेच्या बाबतीत ओळखल्या जाणाऱ्या या महाराष्ट्राला आज राजकारण्यांनी गलीच्छ केल्याचे स्पष्ट दिसून येते आणि त्याचे जिवंत उदाहरण सर्वांसमोर आहे.राज्याला असे कदापि वाटत नव्हते की,सहकारमंत्री बाबासाहेब पाटील एवढे निर्लज्जतेचा कळस गाठतील.परंतु आजकाल राजकीय पुढाऱ्यांच्या जिभेला हाडच रहालेले नाही ही बाब पाटील यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते.आपण काय बोलतो आणि कोणाबद्दल बोलतो याबद्दल थोडीशी जणांची नाहीतर मनाची लाज वाटायला पाहिजे! मंत्रीमहोदय म्हणतात निवडणूक जिंकण्यासाठी आम्ही काहीही आश्वासन देतो. लोकांना कर्जमाफीचा नाद लागला आहे,असे वादग्रस्त वक्तव्य सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी जळगाव येथील चोपडा येथे केले.शेतकरी वारंवार कर्ज माफी का मागतात याचा विचार पाटील यांनी कधी केला का? शेतकऱ्यांना शेती करतांना किती यातना व दुःख सोसावे लागतात याची जाण पाटलांना आहे का?ऊन, पाऊस, थंडी, वादळ,सुका दुष्काळ,ओला दुष्काळ,परिवाराच्या वेदना अशाप्रकारे राज्यातीलच नाही तर देशातील संपूर्ण शेतकरी या संपूर्ण घडामोडी मधुन आपल्या शेतात अन्नधान्यांचे उत्पादन काढत असतो.तेव्हा देशाच्या १४० कोटी जनतेच्या पोटाची खळगी भरत असते.परंतु सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी वादग्रस्त वक्तव्य करून राज्याच्याच नाही तर देशातील संपूर्ण शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले व अपमान केला आहे.आज अती पाऊसामुळे मराठवाडा, विदर्भ, कोकण इत्यादीसह राज्यातील अनेक भागातील शेतकरी अत्यंत दुःखी व चिंतेत आहे.कारण त्यांची पिके तर गेलीच सोबत शेतातील माती सुध्दा वाहुन गेली व काही भागात जिवितहानी सुध्दा झाली. अशी भयावह परिस्थिती शेतकऱ्यांची आहे.राज्यात अतिवृष्टीमुळे ३६ पैकी ३१ जिल्हे अत्यंत प्रभावीत आहेत.त्याचप्रमाणे आजही राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यां अजुनपर्यंत थांबलेल्या नाहीत. ह्या गोष्टींचा अभ्यास करण्यापेक्षा मंत्री शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करतात हे कसले लोकप्रतिनिधी व कसले मंत्री अशांना तर शेतकऱ्यांनी गाव बंदी करायला पाहिजे.शेतकरी हा अन्नदाता असुन देशाचा आधारस्तंभ आहे.त्यामुळे त्यांची सर्वतोपरी मदत होणे गरजेचे आहे.राज्यासह देशातील राजकीय पुढारी पाच वर्षांत करोडपती होतो व मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती गोळा करतो. परंतु शेतकऱ्यांचे तसे नसते आज शेतकरी मानाने, विचाराने व जमिनीने करोडपती असुन सुद्धा पैशांनी शुन्य आहे याची जाण सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी लक्षात ठेवली पाहिजे. चुकीचे वक्तव्य करून उचल्ली जिभ लावली टाळ्याला हा प्रकार राजकीय पुढाऱ्यांनी ताबडतोब बंद केला पाहिजे. कर्जमाफी ही बाबासाहेब पाटील यांच्या खिशातून होते का? किंवा यांच्या पगारातून होते.यांना तर असे वाटते की शेतकऱ्यांची कर्ज माफी म्हणजे आपले दिवाळे निघते की काय! त्यामुळे मंत्री बाबासाहेब पाटील थोडी शरम करा आणि असे घृणास्पद वक्तव्य करण्यापासून स्वतःची जिभ आवरा. आपण मंत्री आहात म्हणून काहीही बोललेले शेतकरी खपवुन घेणार नाही.राजकीय पुढारी व मंत्री पाटील यांनी लक्षात ठेवले पाहिजे की आपण एसीमध्ये बसता, लाखांच्या गाडीत फिरता, करोडोंच्या घरात रहाता,हवाई सफर करता,आलेशान खुर्चीवर बसता. परंतु शेतकरी हा मातीत राबतो,जमीनीवर रहातो, ऊन, पाऊस,थंडीची झळा सहन करतो तेव्हा त्याची शेती होते व शेतीतून उत्पन्न काढतो त्याला म्हणतात हाडामासाचा शेतकरी. फक्त खुर्चीवर बसल्याने,लोकप्रतिनिधी झाल्याने व खोटी समाजसेवा केल्याने कोणी समाजसेवक होत नाही, यासाठी मेहनत करावी लागते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या बेजबाबदार वक्तव्यावरून असे वाटते की यांना शेतकऱ्यांशी काहीही देणेघेणे नाही फक्त मत लुबाडण्यासाठी शेतकऱ्यांना खोटे आश्वासन देवून दिशाभूल करून आपली राजकीय पोळी शेकण्याचे काम पाटील करीत आहे.त्यामुळे अन्नदाता शेतकरी यांची बेजबाबदार वक्तव्यातून पाटील यांनी केलेली विटंबना अत्यंत शर्मनाक व घृणास्पद असल्याने त्यांना कोणत्याही संविधानीक पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिकार नाही असे मला वाटते.कारण मंत्री महोदयांनी लक्षात ठेवले पाहिजे की शेतकरी जगला तरच आपल्याला अन्न पुरवठा होईल.आज ग्लोबल वॉर्मिगमुळे, युद्धजन्य परिस्थिती व बदलत्या हवामानामुळे राज्यातीलच नाही तर संपूर्ण जगातील शेतकरी अत्यंत दुःखी व चिंतेत आहे.त्यामुळे त्यांच्यापुढे नेहमीच जिवन मरणाचा प्रश्न उपस्थित होतो. राज्यासह देशातील अनेक राज्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण मोठ्या वाढल्याचे दिसून येते.फक्त मंत्री बनुन तोंडानी बोलने सोपी आहे पाटील साहेब शेताच्या धुऱ्यावर जाऊन पहा, चिखलात पाय रूजवुन पहा,एखाद्या शेतकऱ्यांच्या घराला भेट देऊन पहा त्यांच्या व्यथा पाहून सर्वसामान्यांच्या डोळ्यात अश्रू येतात आणि तुमच्या सारखे निर्लज्ज मंत्री तोंडांत आले तसे ओकतात ही महाराष्ट्रा सारख्या सुसंस्कृत व संतभुमिला शोभा देत नाही. आपण राज्याला कलंकित करण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे या निर्लज्ज मंत्र्यांच्या बाबतीत मी हेच म्हणेल की,आपण हाडामासाचे शेतकरी आहोत.त्यामुळे अशा मंत्र्यांना राज्यातील कोणत्याही गावात पाय ठेवण्याचा अधिकार नाही असे मला वाटते.यापुर्वी असेच वादग्रस्त वक्तव्य माजी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केले होते तरीही ते आजही मंत्री आहेत याला काय म्हणावे समजत नाही!अशांना तर संपूर्ण संविधानीक पदावरून पायउतार करायला पाहिजे.आज महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही आणि अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना कर्जाचा सहारा घ्यावा लागतो.बदलत्या हवामानामुळे निसर्ग शेतकऱ्यांना पुर्णपणे साथ देत नाही अशा परिस्थितीत कर्जाचे ओझे दिवसेंदिवस वाढत जाते व शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ येते.

सरकार निवडणुकीच्या तोंडावर अनेक योजना जाहीर करतात व राबवितात हा पैसा जनतेचा असतो मंत्र्यांच्या घरचा किंवा त्यांच्या खिशातील नसतो.त्यामुळे आज शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीत सापडला आहे त्यामुळे त्यांचे कर्ज माफ जर केले तर सरकारचे किंवा मंत्र्यांच्या खिशाला कोणती कात्री लागणार आहे?शेतकऱ्यांना जर कर्ज माफ झाले तर राज्याच्या जनतेमधून पैसा जाईल व याचे स्वागत राज्याची जनता सुध्दा करेल. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी किंवा मंत्र्यांनी वादग्रस्त वक्तव्य देणे बंद करून ताबडतोब शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घ्यावा व वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या राज्यपालांनी व सरकारने आवराव्या.जय जवान जय किसान, जय हिंद.

**-लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**

# १४ वर्षाच्या रितेश गवळीने आई - बहिणीसह पाच जणांचे वाचवले प्राण



**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**/ अंबाजोगाई तालुक्यातील घोलपवाडी या गावातील रितेश मारोती गवळी याने आई बहिणीसह पाच जणांचे प्राण वाचवले.घोलपवाडी गावाजवळील एका तलावापाशी आई बहीण व इतर काही व्यक्ती धुणं धुवत असताना पाय घसरून पडल्याने एकमेकाला वाचवण्यासाठी एकमेकांनी प्रयत्न केला पण कोणालाही पोहता येत नसल्याने सगळे पाण्यामध्ये घटाळ्या खात होते रितेश गवळीने आरडाओरडा करून सुद्धा कोणीही मदतीला आले नाही त्यामुळे स्वतः पाण्यामध्ये उडी घेतली. रितेश गवळी हा बालक वय वर्षे १४ सोमेश्वर विद्यालय घाटनांदुर येथे शिक्षण घेतो त्याने कोणत्याही परिस्थितीचा विचार न करता आई-बहीण व इतर तीन जणांचे पाण्यामध्ये उडी घेऊन प्राण वाचवले पण हे करत असताना तो स्वतःला मोठी जोखीम झाली गेली वीस दिवसापासून स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय अंबाजोगाई मृत्यूशी झुंज देत आहे.रितेश गवळीने आई बहिण व इतर तिघांचे प्राण वाचवले त्याची झालेली परिस्थिती पाहून आईला असे वाटते मी जरी मेले असतो तरी चालले असते पण रितेश ला काही झाले नसते.रितेश गवळीचे वडील काही दिवसापूर्वी पॅरॅलिसिस झाल्यामुळे मृत अवस्थेमध्ये असल्यासारखे आहेत आई मजुरी करून कुटुंब चालवते यामध्ये रितेश ची परिस्थिती सध्याला तो गेली वीस दिवसापासून कोमा मध्ये आहे. पुढील उपचार करण्यासाठी आता त्याकडे पैसे नाही.सोमेश्वर विद्यालय घाटनांदुर येथील आपला विद्यार्थी आहे असे समजून शिक्षकांनी आंबेजोगाई रुग्णालयामध्ये दाखल करेपर्यंत थोडीफार मदत करण्यात आली आता पुढील उपचारासाठी अंबाजोगाई शहरातील व परिसरातील स्वयंसेवी संस्था व दानशूर व्यक्तींनी पुढे येऊन या चौदा वर्षाच्या रितेश मारोती गवळीला वाचवण्यासाठी जी काही समाजामधून मदत करता येईल ती मदत करावी अशी कळकळीची विनंती रितेश गवळी यांची आई करत आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ शाखा आंबेजोगाई च्या वतीने संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अ.र. पटेल साहेब संतोष केंद्रे पत्रकार राम जोशी दिलीप अरसूळ मदत करण्यात आली.

## मायगाव येथील ६० पूरग्रस्त कुटुंबांना साहित्य वितरित

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/ अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पैठणच्या मायगाव येथील अनेक कुटुंबांचे नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी मॅजिक वीरा ग्रुप पुढे सरसावला असून, त्यांनी पूरग्रस्त ६० कुटुंबांना भांडी व घरगुती साहित्याचे वाटप केले.सचिव रीता पूरवार यांनी गावकऱ्यांच्या गरजांविषयी माहिती घेतली. मदत साहित्यात भांड्यांचे किट, बेडशीट, टॉवेल आदी वस्तूंचा समावेश आहे. वाटप शनिवारी करण्यात आले. सरपंच किशोर दसपुते यांनी आभार मानले.

## सुनंदा कडुबा डीघोळे यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**/ सौ. सुनंदा कडुबा डीघोळे, वय ४७, रा. एन-६, आविष्कार कॉलनी, संभाजीनगर यांचे दीर्घ आजाराने दिनांक १०-१०-२०२५ रोजी दुःखद निधन झाले.त्यांच्यावर एन -६ येथील स्मशानभूमी येते दिनांक १०-१०-२०२५ रोजी रात्री ८ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगी व मुलगा असा परिवार आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी' योजनेचा शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'चा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृह, पुसा, नवी दिल्ली येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे झाला. प्रधानमंत्री धन धान्य कृषी योजनेत राज्यातील ९ जिल्ह्यांची निवड झाली असून केंद्राच्या व राज्य शासनाच्या योजनांच्या माध्यमातून तेथील शेतकऱ्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.



प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'च्या दूरदृष्य प्रणालीद्वारे शुभारंभानिमित्त पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सभागृहात आयोजित राज्यस्तरीय कार्यक्रमात कृषीमंत्री भरणे बोलत होते. यावेळी आमदार बापू पठारे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, कृषी संचालक विनयकुमार आवटे, रफिक नायकवडी, सुनील बोरकर, अशोक किरनळ्ळी, सहसंचालक दत्तात्रय गावसाने आदींसह राज्यातील कृषी सखी, प्रगतिशील महिला, पुरुष शेतकरी, कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### ४२ हजार कोटी रुपयांच्या कृषी योजनांचे उद्घाटन तथा पायाभरणी

४२ हजार कोटी रुपयांच्या कृषी योजनांतर्गत 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना', कडधान्य आत्मनिर्भरता अभियान, कृषी पायाभूत सुविधा निधी, पशुपालन, मत्स्यपालन आणि अन्न प्रक्रिया उद्योग यांचे १ हजार १०० पेक्षा अधिक प्रकल्पांचे उद्घाटन तथा पायाभरणी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे झाली.

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, केंद्र व राज्य शासन शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेतकरी सक्षम व्हावा यादृष्टीने काम करत आहे. यावर्षी जून ते सप्टेंबरपर्यंत राज्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकरी अडचणीत आला. त्याच्या हाता तोंडाशी आलेल्या पिकाचा चक्काचूर झाला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांनी त्या भागात दौरे करून शेतकऱ्यांचे दु:ख, अडचणी जाणून घेतल्या. या शेतकरी बांधवांना उभे केले पाहिजे यादृष्टीने राज्य शासनाने चांगले पॅकेज जाहीर केले आहे.

अनेक ठिकाणी नदीकडेला शेतीत माती राहिली नाही, वीजरोहित्र (ट्रान्सफॉर्म), वीजपंप राहिले नाहीत. त्यामुळे या नुकसानीसाठी साधारणत: ३१ हजार ६२७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. अजूनही त्यात काही बाबींचा समावेश करण्यात येईल. यात कोरडवाहू शेतीला १८ हजार ५०० रूपये, हंगामी बागायत शेतीला २७ हजार आणि बागायती शेतीला ३२ हजार ५०० रुपये हेक्टरी असे आणि रब्बीसाठी पाणी उपलब्ध आहे अशा ठिकाणी १० हजार कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

राज्यात ३ हजार ५०० कृषी सखी काम करत असून त्या स्वत: प्रशिक्षण घेऊन तेथील महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत आहेत. त्याचा अभिमान असून कृषी समृद्धी योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सुरू केलेल्या मोठ्या योजनेची माहिती घेऊन सेंद्रीय शेतीमधील तंत्रज्ञान, कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी, शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी कृषी सखींनी मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कडधान्य हे आपल्या आहारातील प्रथिनाचे मुख्य साधन असून आपल्या देशात अजूनही कडधान्याची कमतरता आहे. चना, मूग, तूर, उडीद, मसूर यांचे वाढविण्यात येणार असून भारत आत्मनिर्भर बनणार आहे. कडधान्याच्या शेतीसाठी खतांचा वापर कमी होत असल्यामुळे नैसर्गिक शेती आणि कडधान्य शेती एकमेकांना पूरक बाबी असल्याने त्याचा जमीनीचा पोत वाढण्यासाठी फायदा होतो. शेतीसाठी सूक्ष्म सिंचनाचा अवलंब करा, सेंद्रीय खताचा वापर करावा.

शासनाच्या योजनांचा लाभ घ्या, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा आणि आपल्या शेतीला नवसंजीवनी द्यावी, असे आवाहन करतानाच शेतीसाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केल्यास महाराष्ट्र राज्य शेतीमध्ये अग्रेसर राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कृषी आयुक्त मांढरे म्हणाले, आपले उत्पादन दुप्पट करण्याचे काम शेतकऱ्यांनी केले आहे. मात्र उत्पन्न दुप्पट न होता उत्पादित पिकाला योग्य बाजारभाव कमी मिळत असल्याने कमी झाले आहे. त्यासाठी उत्पादित कृषीमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्य वाढविणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी मालाचा बाजारभाव स्वत: कसा ठरविता येईल यासाठी व्यापारी पद्धतीने विचार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या दृष्टीने विविध विभांगाच्या समन्वयाने काम होणे गरजेचे असून त्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

आवटे यांनी प्रास्ताविकात या योजनेंतर्गत राज्यातील ९ जिल्ह्यात पाच वर्षाचा आराखडा करून कृषी विकासाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी महाडीबीटीच्या माध्यमातून विविध योजनांच्या लाभासाठी सर्वाधिक ४३ लाख १५ हजार शेतकऱ्यांची निवड केल्याची माहिती देण्यात आली.कार्यक्रमात सेंद्रिय शेतीत उत्कृष्ट काम केलेल्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. काही प्रगतिशील महिला शेतकऱ्यांना त्यांचे पुरस्कारांमध्ये नाव नसतानाही त्यांच्या कामाची दखल घेऊन कार्यक्रमातच पुरस्कार देण्याचा निर्णय कृषीमंत्री भरणे यांनी घेतल्याने या महिलांचा आनंद द्विगुणित झाला. यावेळी कृषीमंत्र्यांनी कृषी सखी, प्रगतिशील शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अपेक्षा व सूचना जाणून घेतल्या.

याप्रसंगी नैसर्गिक शेतीत चांगले काम केलेल्या शेतकऱ्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कृषी विभागाने तयार केलेल्या नैसर्गिक शेतीविषयक तीन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

### 'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'त राज्यातील ९ जिल्ह्यांचा समावेश

'प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजने'त कमी उत्पादकता असलेले, कमी सिंचन क्षमता असलेले, कृषी कर्जाच्या उपलब्धतेबाबत समस्या असलेल्या देशातील १०० आकांक्षित जिल्ह्यांची निवड केंद्र शासनाने केली आहे. सद्य:स्थितीमध्ये राज्यामध्ये केंद्र व राज्य शासनाद्वारे कार्यान्वित असलेल्या ३६ हून अधिक केंद्रीय आणि राज्य योजनांच्या अभिसरणाद्वारे पिकांची उत्पादकता वाढवणे, पीक उत्पादनाची शाश्वतता सुनिश्चित करणे तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञान व पतपुरवठा प्रणाली मजबूत करण्याच्या उद्देशाने ही योजना राबविण्यात येणार आहे. यात महाराष्ट्रातील पालघर, रायगड, धुळे, छत्रपती संभाजी नगर, बीड, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या नऊ जिल्ह्यांची निवड झालेली आहे.

## संक्षिप्त

### जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या आरक्षित जागांसाठी सोमवारी सोडत

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव / प्रतिनिधी /** पंचायत समितीच्या सहा गणांसाठी अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यातील महिला आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यासाठी सोमवारी सकाळी ११ वाजता सोयगावात बचत भुवन सभागृहात सोडत काढली जाणार आहे. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांचे आरक्षण चक्रानुक्रम) नियम २०२५ नुसार पंचायत समितीच्या क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. पंचायत समितीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने कार्यवाहीसाठी सभा होणार आहे.सोयगाव येथील बचत भुवन सभागृहात पंचायत समितीच्या सहा गणांसाठी सोमवारी सकाळी अकरा वाजताआरक्षण सोडत काढण्यात येणार असून जिल्हा परिषदेचे तीन गटांची सोडत जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे गणांच्या आरक्षणनिश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी सोयगाव येथे विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सभेस तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहावे.असे आवाहन तहसीलदार मनीषा मेने-जोगदंड यांनी केले आहे.

### लासुर स्टेशन येथे वातानुकुलीत शवपेटीचे लोकार्पण

**लासुर स्टेशन येथील कै इंद्रचंदजी मानकचंद मुथा कै सौ चारुलताबाई इंदरचंदजी मुथा यांच्या स्मरणार्थ शवपेटीचे केले लोकार्पण ...**



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी /** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील श्री गणेश मंदिर संस्थान गणरायाची महाआरती करून शवपेटीचे लोकार्पण करण्यात आले व विधीवत पुजा करण्यात आली दरम्यान यावेळी लासुर स्टेशनचे अभय कुमार, रोहित कुमार, हर्षकुमार मुथा व सह पत्नी सत्कार करण्यात आले व गावकऱ्यांनी आभार व्यक्त केले यावेळी मर्चंट बँकेचे माजी संचालक मदनलालजी लोढा दिगंबर जैन समाजाचे माजी अध्यक्ष विनोद कुमार ठोळे प्रकाश शेठ कर्णावट संतोष पाटील जाधव संतोष शेठ शर्मा दिगंबर पवार गोकुळ शेठ राजपूत नाना मत सागर आरती मंडळाचे अध्यक्ष अजय जैस्वाल संतोष साखळे आदी मान्यवर उपस्थित होते,शवपेटीसाठी कैलास शर्मा बाळू शर्मा नारायण ठोळे यांनी विशेष परिश्रम घेतले.हि वातानुकुलीत शवपेटी सर्व सामान्यान तसेच रात्री मध्यरात्री घटना घडल्यास पार्थिव ठेवण्यासाठी नि: शुल्क देण्यात येणार आहे.

# लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची नगराध्यक्षपदासाठी जोरदार एंट्री ?

**आत्ताच एक्सप्रेस**

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)** लोकशाही व्यवस्थेतील चौथास्तंभ मानल्या जाणाऱ्या पत्रकारितेतील एक धडाडीचे नाव गजानन मुडेगांवकर हे राजकारणात सक्रीय आहेतच पण आता शिवसेने (शिंदे गट)कडून त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी पक्षाकडे उमेदवारी मागितली असून सर्वसान्याचा उमेदवार म्हणून त्यांची जोरदार चर्चा सध्या अंबाजोगाई शहरात रंगली असून त्यांचे नाव चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक भान, जनतेशी थेट नाळ जोडलेली आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक वर्षे सामान्य नागरिकांचे प्रश्न मांडणारे गजानन मुडेगांवकर आता थेट नगराध्यक्ष म्हणून जबाबदारी स्विकारण्याच्या विचारात असल्याचे दिसून येत आहे.

अंबाजोगाई नगर परिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाची उमेदवारी जाहीर होणे एक महत्त्वाचा भाग असून ते पायाभूत सुविधा, रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी यांसारख्या प्रश्नांवर नेहमीच आवाज उठवितात.

रस्ते, पाणी, पथदिवे आणि सर्वांगिण विकास अशा महत्वपुर्ण गोष्टींवर काम करणारा लोकप्रतिनिधी म्हणून खऱ्या अर्थाने काम करणाऱ्या व्यक्तीची गरज भासत होती, आणि त्यामुळेच मुडेगांवकर यांच्या नावाला जनतेत चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. राजकारण करत असताना शिवसेनेची शिकवण ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या विचारांशी बांधील राहून जनते सोबत



असलेला त्यांचा संपर्क,त्यांच्या महत्वपुर्ण प्रश्नांवर घेतलेली ठाम भूमिका, वेळोवेळी केलेला पाठपुरावाआणि कार्यक्षम नेतृत्व यामुळे गजानन मुडेगांवकर नगराध्यक्ष पदासाठीच्या निवडणुकीत चर्चेचा विषय ठरत आहे. मुडेगावकर यांनी अनेक वर्षे शहरप्रमुख म्हणुन शहरात संघटन केले आहे तर स्वा.रा.ती रुग्णालय अभ्यागत मंडळावर असल्याने अनेक नागरिकांच्या अडचणी सोडवल्या आहेत तसेच कामगार संघटनेचा पाठिंबा असल्याने त्यांचा शहरातील सर्वसामान्य ते ज्येष्ठां पर्यंतचा जन संपर्क दांडगा मानला जात आहे

स्थानिक नागरिक त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शवत, आम्हाला काम करणारा नेता हवा, केवळ प्रसिद्धीचा हव्यास नसलेला नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे. राजकारणात नव्या दमाच्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या लोकांना संधी देण्याची वेळ आली आहे, असे मतही काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त करून गजानन मुडेगांवकर यांचे स्वागत केले आहे. आता त्यांच्या उमेदवारी जाहीर होण्याच्या प्रक्रिये कडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

### सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या पान ४ वरून.....

भारत देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा.भूषण गवई यांच्यावर जातीय मानसिकतेने राकेश केशव नावाचा वकील धावून गेला आणि तो पायातला बूट काढणार त्याचवेळी न्यायालयातील सुरक्षारक्षक त्याच्या दिशेने धावले व न्यायालयाबाहेर नेले त्यामुळे मोठा अनर्थ टळला सनातन का अपमान नही सहेंगा हिंदुस्तान अशा घोषणा सडलेल्या मनोवादी वकिलांनी यावेळी दिल्या होत्या, त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या वतीने या वकिलाचा जाहीर निषेध करून या वकिलावर कडक कार्यवाही करावी अशी मागणी दि.०९.१०.२०२५ रोजी केज येथील तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.हे निवेदन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आंबेडकर पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ) निकाळजे यांच्या आदेशाने व मराठवाडा अध्यक्ष भगवंत आप्पा वायबसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिले आहे.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते म्हाडा कोकण मंडळ सोडत-२०२५ संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**ठाण(जिमाका)** ठाणे येथील डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते म्हाडा कोकण मंडळ सोडत - २०२५ अंतर्गत ५ हजार ३५४ सदनिका आणि ७७ भूखंड विक्रीसाठी संगणकीय सोडत संपन्न झाली.यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार नरेश म्हस्के, आमदार निरंजन डावखरे, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर, म्हाडाचे इतर अधिकारी व नागरिक उपस्थित होते.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, म्हाडाच्या कोकण विभागाची जवळपास ५ हजार ३५४ घरांची सोडत आज संपन्न झाली. आज सगळ्यांच्याच दृष्टीने आनंदाचा दिवस आहे. सर्वसामान्यांच्या हक्काच्या घराचा स्वप्नपूर्तीचा आजचा दिवस आहे. प्रत्येकाचं घर हे स्वप्न असते आणि त्याची पूर्तता आज करण्याचा दिवस आहे. ज्यांना घराची लॉटरी लागली आहे त्यांची दिवाळी नवीन घरात होईल, गोड होईल आणि ज्यांना लॉटरी नाही लागली त्यांनीही निराश होवू नये. एक इमारत किंवा घर म्हणजे चार भिंतीच घर किंवा एक इमारत एवढ्या पुरतं ते मर्यादित नसून घर हे प्रत्येकाच्या आयुष्यातले एक मोठे स्वप्न असते आणि त्यामध्ये कुटुंबाच्या सुरक्षिततेचा, आत्म सन्मानाचा आणि सुख समृद्धीचा पाया हे घर आहे आणि म्हणूनच घराचं स्वप्न साकार करणाऱ्या म्हाडाचं मी मनापासून अभिनंदन करतो.

आज ५ हजार ३५४ घरे आणि ७७ भूखंडांसाठी संगणकीय पद्धतीने लॉटरी काढण्यात आली असून यामध्ये अतिशय पारदर्शक पद्धतीने लॉटरी काढण्यात आली. आम्ही सुरुवातीपासून हीच भूमिका ठेवली की, जी लॉटरी निघेल त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. कुणालाही कुणाच्या माणसासाठी शिफारस करता येणार नाही आणि शिफारस केली तरी त्याला घर मिळणार नाही. अशा पारदर्शक कार्यपद्धतीमुळे म्हाडावर विश्वास निर्माण होण्याची जी काही गती आहे ती वाढलेली आहे. मगाशी मला संजीव जयस्वाल म्हणाले की, ५ हजार ३५४ घरांसाठी १ लाख ८४ हजार ९९४ अर्ज प्राप्त झाले आहेत. यावरून निश्चितपणे लक्षात येतं की म्हाडावर आणि त्याच्या घरांच्या क्वालिटीवर आणि किमतींवर सर्वसामान्य लोकांचा आता विश्वास बसलेला आहे, वाढत चाललेला आहे. आता म्हाडाची घरं उत्तम दर्जाची आणि वेळेमध्ये पूर्ण होत आहेत. त्यामुळे एक विश्वासाचं नातं निर्माण करण्याचं काम म्हाडाने केलेलं आहे. परवडणारे घर देणारे कुठले प्राधिकरण तर म्हाडा हे नाव आपण घेतो आणि म्हणूनच खऱ्या अर्थाने म्हाडा केवळ एक गृहनिर्माण संस्था नाहीये तर सर्वसामान्यांचे आयुष्यामध्ये आनंद निर्माण करणारी विश्वासाची शिदोरी आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

मी गृहनिर्माण मंत्री झाल्यानंतर आम्ही म्हाडाची एक नवीन पॉलिसी आणली. या नवीन पॉलिसीमध्ये परवडणारी घरे याला प्रथम प्राधान्य दिले आहे. यामध्ये आपल्या नोकरदार महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी वसतीगृह व गिरणी कामगारांसाठी घरे उपलब्ध होणार आहेत. पंतप्रधान आवास योजनेमधून देखील आदरणीय प्रधानमंत्री मोदी यांनी दोन कोटी घरांचे उद्दिष्ट ठेवले होते. क्लस्टरच्या माध्यमातून आपण एक मोठा निर्णय घेतला. जसं बाळासाहेब म्हणायचे की, मुंबईमध्ये चाळीस लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घर देण्याचं, तेव्हा लोकांना वाटलं की हे साध्य होईल का. परंतु खऱ्या अर्थाने त्याची सुरुवात आता आपण केलेली आहे आणि आता आपण टप्प्याटप्प्याने घर बांधतोय आणि त्याची सुरुवात झाली याचा मला अभिमान आहे. मुंबईतील रमाबाई आंबेडकर नगर मधील घरांचा प्रकल्प आहे तिथे एसआरए आणि एमएमआरडीए एकत्रितपणे काम करीत आहेत. मुंबई महानगर प्रदेशाचा आपल्याला पुनर्विकास करायचा असेल तर रखडलेल्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी आपण मोठ्या प्रमाणावर हे सगळे जॉईंट वेंचर केले पाहिजेत. कारण सरकारी प्राधिकरणावर लोकांचा विश्वास असतो आणि वेळेमध्ये काम करण्याची जी क्षमता आहे यामधून मोठ्या प्रमाणावर लाखो घरे तयार होतील.

आता जीएसटीच्या माध्यमातून देखील घरांच्या किमतीमध्ये फरक पडलेला दिसेल



आणि मोदी साहेबांनी जीएसटीचे दोन स्लॅब काढून टाकले असून जीवनावश्यक वस्तूंना त्यामध्ये फायदा झाला, यामध्ये घर घेणाऱ्यांनाही फायदा होईल, नोकरदार वर्गाला देखील त्याचा फायदा होतोय आणि जे छोटे-मोठे व्यापारी, दुकानदार त्यांनाही त्याचा फायदा होतो. ज्येष्ठांसाठी देखील आपण पॉलिसी केलेली आहे आणि ज्येष्ठांसाठी गृहनिर्माण धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून त्यांच्या आशीर्वादाने आपण हे सर्व काम करत असतो. मी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींचे अभिनंदन यासाठी करेल की, हाऊसिंग फॉर ऑल (सगळ्यांसाठी घर), रोटी कपडा मकान हा जो विषय आहे तो म्हाडाच्या माध्यमातून आपण त्याची पूर्तता करतोय आणि मुंबई आणि एमएमआर मध्ये मोठ्या प्रमाणावर घरं निर्माण कशी होतील आणि तिथे लोकांना कसा फायदा होईल हे देखील पाहतोय. क्लस्टर डेव्हलपमेंट मध्ये ओपन स्पेस गार्डन, मैदान, वैद्यकीय या सगळ्या सुविधा त्यामध्ये आपण देतोय आणि म्हणूनच क्लस्टर देखील एक महाराष्ट्रामध्ये मुंबई एमएमआर मध्ये प्रभावी ठरेल. देशामध्येच नाही जगामध्ये ही क्लस्टर योजना आपल्या राज्याने पहिली सुरू केलेली आहे, असेही ते शेवटी म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी केले.

## संक्षिप्त

### शेतकऱ्यांची दिवाळी गोड 'समृद्धी'कडून १०० रुपये टन प्रमाणे चौथा वाढीव हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात होणार जमा




**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी /प्रतिनिधी/** गाळप हंगाम २०२४ –२५ मध्ये शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी भाव देणाऱ्या समृद्धी साखर कारखान्याकडून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात उसाचा चौथा वाढीव हप्ता जमा करण्यात येणार आहे. समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी हा निर्णय घेतला.मराठवाड्यात उच्चांकी दर देणारा साखर कारखाना म्हणून समृद्धी शुगर्स ओळखला जात आहे. सन २०२४ –२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला समृद्धी ने २९७० रु. प्रती मे.टन भाव जाहीर केला आहे.आतापर्यंत शेतकऱ्यांना पहिला हप्ता २५०० प्रती मे. टन प्रमाणे दिला. तर दुसरा आणि तिसरा हप्ता अनुक्रमे दोनशे व शंभर रुपये प्रमाणे दिला आहे. आता दिवाळी सणानिमित्त चौथा वाढीव हप्ता १०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे दिवाळीपूर्वी शेतकरी सभासदांना मिळणार आहे. या शेतकरी हिताच्या निर्णयाचे शेतकऱ्यांनी फटाके फोडून स्वागत केले. शेतकऱ्यांची दिवाळी गोड केल्याबद्दल चेअरमन सतीश घाटगे यांचे मानले आभार.

### नादरपुर येथील यादव निकम यांच निधन

**आत्ताच एक्सप्रेस**



**कन्नड/प्रतिनिधी/**कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील कै यादव अप्पा निकम वय ६५ यांचे रविवारी सकाळी सात वाजता दुखत निधन झाले त्यांच्यावर दुपारी दोन वाजता नादरपुर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगी दोन मुले सुना नातवंड जवाई असा परिवार असून हरी व संजय निकम यांचे वडील होते.

### जालना तालुक्यातील बाजीउम्रद तांडा येथील माजी सरपंच वाघू चव्हाण यांच्यासह अनेक युवकांचा



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना तालुक्यातील बाजीउम्रद येथील युवकांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. माजी केंद्रीय मंत्री तथा भाजपा नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या संघटन कौशल्यावर विश्वास ठेवून त्यांनी प्रवेश केला, यावेळी भाजपा जालना तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पक्ष प्रवेश प्रमुख माजी सरपंच वाघू चव्हाण यांच्या सोबत प्रभू चव्हाण, मधूकर चव्हाण, अंकुश चव्हाण, रमेश पवार, अचित राठोड, शिवाजी चव्हाण, विशाल चव्हाण, बंडू चव्हाण, संतोष राठोड, सुनिल चव्हाण, पांडुरंग चव्हाण, भाऊसाहेब चव्हाण, संतोष राठोड, रावसाहेब चव्हाण, प्रदिप चव्हाण,रामेश्वर चव्हाण, संदीप चव्हाण, योगेश चव्हाण, दिलीप राठेड, योगेश पवार आदींचा समावेश आहे.या प्रसंगी जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सर्वांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी सांगितले की भाजप परिवारात दाखल झालेल्या या नव्या ऊर्जेमुळे पक्ष आणखी सक्षम व सबळ होईल. भाजपच्या विचारधारेतून समाजहित साध्य करण्याची संधी नव्या पिढीला मिळणार आहे. या प्रवेश सोहळ्याला नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे, उपाध्यक्ष सिद्धिविनायक मुळे, प.स. सदस्य मुकेश चव्हाण, राजेंद्र भोसले, विष्णू डोंगरे, सरपंच विजय मोहिते, सरपंच ज्ञानेश्वर राठोड, उपसरपंच विष्णू मोहिते, बाबा उगले, सुमित सुरडकर, हर्षवर्धन दाभेराव, दिलीप अर्जुने, विष्णू राठोड, दौलत भुतेकर, सचिन चव्हाण, सावळीराम मोहिते, भाऊ राठोड आदींची उपस्थिती होती.

# समानतेच्या भावनेसाठी आरक्षण व्यवस्था कालबद्ध पद्धतीने रद्द करा; पंतप्रधानांना–धनावत यांचे निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**भारतीय संविधानाने दिलेल्या समानतेच्या मूळ भावनेचे रक्षण करण्यासाठी देशातील आरक्षण व्यवस्था टप्प्याटप्प्याने आणि कालबद्ध पद्धतीने संपुष्टात आणण्याच्या मागणीसाठी येथील विधिज्ञ महेश सीताराम धनावत यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक सविस्तर निवेदन पाठवले आहे. या निवेदनात, आरक्षणाचे सध्याचे स्वरूप संविधानाच्या मूळ उद्देशाच्या विरुद्ध असून सामाजिक समानतेसाठी ते रद्द करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

धनावत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधान निर्मात्यांनी आरक्षणाची कल्पना ही एक तात्पुरती तरतूद म्हणून केली होती. ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने आणणे हा यामागील मुख्य उद्देश होता. संविधानाच्या अनुच्छेद ३३४ नुसार राजकीय आरक्षणासाठी सुरुवातीला केवळ दहा वर्षांची मुदत ठेवण्यात आली होती, हे या तात्पुरत्या स्वरूपाचे द्योतक आहे. मात्र, त्यानंतरच्या संविधान दुरुस्त्यांद्वारे ही तात्पुरती तरतूद सातत्याने वाढवण्यात आली, ज्यामुळे एक अल्पकालीन उपाययोजना कायमस्वरूपी व्यवस्थेत बदलली.

या निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निकालांचा संदर्भ देण्यात आला आहे. इंद्रा साहनी विरुद्ध भारतीय संघ, AIR १९९३ सुप्रीम कोर्ट ४७७, या ऐतिहासिक खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीयांसाठी (OBC) आरक्षणाला मान्यता देताना एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत निश्चित केली होती. प्रशासकीय कार्यक्षमता आणि सर्व नागरिकांसाठी समान संधी या तत्त्वांमध्ये संतुलन साधण्यासाठी ही मर्यादा घालण्यात आली होती. याच निकालात 'क्रिमी लेयर'ची संकल्पना मांडण्यात आली, जेणेकरून आरक्षणाचे लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचावेत आणि मागासवर्गातील सधन घटक त्याचा गैरफायदा घेऊ नयेत.धनावत यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, जातविरहित आणि वर्गविरहित समाजाची निर्मिती करणे हे संविधानाचे अंतिम ध्येय आहे. मात्र, आरक्षणाच्या दीर्घकालीन अंमलबजावणीमुळे जातीय अस्मिता अधिक घट्ट झाल्या आहेत आणि त्या नष्ट होण्याऐवजी अधिक मजबूत झाल्या आहेत. यामुळे मागासलेपणात एक प्रकारचा स्वार्थ निर्माण झाला असून, सामाजिक सक्षमीकरणाच्या मूळ उद्देशापासून भरकटून ते राजकीय तुष्टीकरणाचे साधन बनले आहे.अलीकडच्या काळात मराठा आरक्षण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांच्या (EWS) आरक्षणावरील सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे संकेत दिले आहेत.

आरक्षण अनिश्चित काळासाठी असू शकत नाही, असे मत काही न्यायाधीशांनी तोंडी स्वरूपात व्यक्त केले होते.भारताला खऱ्या अर्थाने समतावादी राष्ट्र म्हणून प्रगती करायची असेल, तर आरक्षणाची कुबडी हळूहळू काढून घेणे आवश्यक आहे, असे ड. धनावत यांनी म्हटले आहे. यासाठी, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक नोकऱ्यांमधील आरक्षणाची टक्केवारी एका निश्चित कालावधीत टप्प्याटप्प्याने कमी करण्याचा एक आराखडा तयार करण्याची गरज आहे. या प्रक्रियेमुळे गुणवत्तेवर आधारित समाजाकडे संक्रमण करणे सोपे होईल आणि दरम्यानच्या काळात खऱ्या गरजू घटकांना आधारही मिळेल.

निवेदनातील प्रमुख मागण्या:१. आरक्षण व्यवस्था कालबद्ध आणि टप्प्याटप्प्याने रद्द करण्यासाठी धोरण तयार करण्याकरिता कायदेतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि इतर संबंधित घटकांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी.२. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कायदेशीर आणि घटनात्मक दुरुस्त्या करण्याची प्रक्रिया सुरू करावी.हे निवेदन व्यापक जनहितासाठी असून, सर्वांसाठी समानता, बंधुता आणि न्याय या घटनात्मक आदर्शांची पूर्तता करण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आले आहे, असे ड. महेश धनावत यांनी शेवटी म्हटले आहे.

## जालना येथे दोन दिवसीय वारकरी-संत साहित्य संमेलनाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि जालना येथील जेईएस महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी डिसेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात दोन दिवसीय संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या संमेलनाची संकल्पना 'ज्ञानाचा सुवर्णक्षण: संत परंपरेचा अमृतमहोत्सव' अशी आहे.संत परंपरेच्या त्रयीचा 'सुवर्णक्षण':

सन २०२५ हे वर्ष मराठी संत परंपरेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या वर्षात ज्ञानसूर्य संत ज्ञानेश्वर माऊलींचे ७५० वे जयंती वर्ष, संत नामदेव महाराजांचे ६७५ वे संजीवन समाधी वर्ष आणि जगद्गुरु संत तुकोबारायांच्या वैकुंठागमनाचे ३७५ वे वर्ष साजरे करण्याचे भाग्य लाभले आहे. ज्ञानोबा–नामदेव–तुकोबा यांच्या या पावन स्मृतींनी पुनित झालेल्या वातावरणात, त्यांच्या विचारांचा अमृतप्रवाह समाजमनापर्यंत पोहचविण्यासाठी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.या वर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने जेईएस महाविद्यालयाला हे महत्त्वपूर्ण संमेलन आयोजित करण्याची आली आहे. या संमेलनाच्या आयोजनाची रूपरेखा निश्चित करण्यासाठी जालना जिल्ह्यातील वारकरी, साहित्यिक, शिक्षक आणि प्राध्यापक यांची नुकतीच एक बैठक महाविद्यालयात पार पडली. या बैठकीत संमेलनाचे अध्यक्ष, विविध चर्चासत्रे, कीर्तन, मुलाखत, ग्रंथदिंडी यांसारख्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या संमेलनात जिल्ह्यातील वारकरी, महिला तसेच शहरातील शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्याचे यावेळी ठरविण्यात आले. वारसा जपणाऱ्या या संमेलनामुळे जालना जिल्ह्याच्या साहित्यिक रसिकांना मान्यवर कीर्तनकार आणि अभ्यासकांना ऐकण्याची संधी मिळणार आहे.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची पोलिस पाटील भरती परीक्षा केंद्रास भेट



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** पोलीस पाटील भरती २०२५ करीता आज पार पडलेल्या परीक्षा केंद्रांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देवून, परीक्षा पारदर्शक व्हावी आणि गैरप्रकार होऊ नये याची पाहणी करून, परीक्षा सुरळीत पार पडेल याची खात्री केली. तसेच परीक्षेच्या तयारीचा आणि व्यवस्थेचा देखील यावेळी आढावा घेतला.

जालना जिल्ह्यातील पोलीस पाटील संवर्गाची पदभरतीसाठी जिल्ह्यातील जालना उपविभाग १८५, भोकरदन उपविभाग २४२, अंबड उपविभाग २५१ आणि परतूर उपविभाग २०४ असे एकूण ७२४ रिक्त पदासाठी आज एकुण २४ परिक्षा केंद्रावर लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. आज पार पडलेल्या पोलीस पाटील भरती परीक्षेला ७८४३ परिक्षार्थीनी परीक्षा दिली. जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी येथील अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना आणि डॉ. बद्रीनारायण बारवाले, महाविद्यालय, जालना या परिक्षा केंद्रास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली.

**२४ परिक्षा केंद्रावर ७८४३ परिक्षार्थींनी दिली पोलिस पाटील भरतीची परीक्षा**

पोलीस पाटील भरती २०२५ ही अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक व कार्यक्षम पद्धतीने यशस्वीरित्या पार पडावी याकरीता सर्व परिक्षा केंद्रावर बैठे पथक व भरारी पथक यांची नियुक्त करण्यात आले होते. या भरती प्रक्रियेमध्ये सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, कर्मचारी, पोलीस यंत्रणा व तांत्रिक पथक यांनी उत्कृष्ट समन्वय व कार्यक्षमता दाखवत उल्लेखनीय योगदान दिले आहे.

त्यामुळे सर्व परिक्षा केंद्रावर शांततापुर्ण वातावरणात परिक्षा पार पडली. कोणत्याही केंद्रावर अनुचित प्रकार घडला नसल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

## दाढेगावच्या विद्यार्थ्यांनीही जपले समाजभान पूरग्रस्त बांधवांसाठी स्वयंस्फूर्त मदत उपक्रमाने दिला संवेदनशीलतेचा संदेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी/ प्रतिनिधी/** अतिवृष्टी आणि नदीला आलेल्या पुरामुळे घनसावंगी, अंबड, आणि परिसरातील गोदाकाठच्या अनेक गावांतील नागरिकांच्या आयुष्यावर संकट कोसळले आहे. घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्य, धान्य, जनावरे, तसेच शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक कुटुंबे विस्थापित झाली असून, नागरिकांना पुन्हा उभं राहण्यासाठी विविध संस्था, संघटना, आणि समाजभान जागृत नागरिक पुढे सरसावत आहेत.

या संकटाच्या काळात दाढेगाव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेले कार्य हे समाजातील प्रत्येकाने अनुकरण करण्यासारखे आहे. लहान वयातच समाजातील दुःख जाणणाऱ्या या विद्यार्थ्यांनी स्वतःहून पुढाकार घेत पूरग्रस्त बांधवांसाठी मदत निधी गोळा केला. विद्यार्थ्यांनी जमवलेल्या एकूण रुपये १,३७० ची रक्कम शालेय समिती अध्यक्ष राजू काकडे, ग्रामपंचायत सदस्य दत्ता शेंडगे, लहू लेंभे, मुख्याध्यापिका श्रीमती मंगल बारगजे, शिक्षक श्री शिवाजी बांगर, श्रीमती ज्योती दराडे, श्री ओंकार आकुसकर, श्रीमती प्रतिभा ज्योतिक, आणि कु. भाग्यश्री देवडे यांच्या उपस्थितीत 'समाजभान' संस्थेचे प्रतिनिधी श्री सोपान पाष्टे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

शाळेच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांनीही आपले योगदान देत संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. शाळेच्या मुख्याध्यापिका मंगल बारगजे मॅडम यांनी १,०००, शिक्षक शिवाजी बांगर सर यांनी १,५००, ज्योती दराडे मॅडम यांनी १,०००, ओंकार आकुसकर यांनी ५०१, तसेच भाग्यश्री देवडे मॅडम यांनी ५०१ इतकी रक्कम देऊन पूरग्रस्तांच्या दिवाळीला आनंद देण्याचा प्रयत्न केला.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण झाली असून, 'इतरांच्या मदतीसाठी छोटासा हातभारही मोठा फरक घडवू शकतो' हा संदेश त्यातून स्पष्ट झाला. दाढेगाव शाळेच्या या कार्याचे स्थानिक नागरिक, पालकवर्ग आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मनःपूर्वक कौतुक केले



आहे.समाजातील लहानगी पिढी जर अशी संवेदनशीलता दाखवत असेल, तर समाजातील करुणा आणि एकोपा यांचा प्रकाश निश्चितच अधिक तेजस्वी होईल, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले.

# जमीन खरेदीला 'बागायती'; पण मदतीच्या वेळी 'कोरडवाहू'

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी /प्रतिनिधी /** घनसावंगी तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात यंदा झालेल्या अतिवृष्टी, सलग पाऊस आणि पुरपरिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. अनेक गावांत सोयाबीन, मूग, उडीद, कापूस, तुर यांसारखी खरीप पिकं अक्षरशः पाण्यात वाहून गेली. अनेकांच्या हातात काडीचीही पिकं उरली नाहीत. घरचं घर उद्ध्वस्त, जनावरांचा चारा संपला, बँकांची थकबाकी डोक्यावर आणि हातात काहीही नाही – अशा अवस्थेत शेतकरी शासनाकडून जाहीर होणाऱ्या अनुदान मदतीकडे डोळे लावून बसले होते.

**शासनाच्या दुटप्पी धोरणाने शेतकरी हैराण; न्याय मिळावा, अशी सर्वत्र मागणी**

पण, नुकसानभरपाई जाहीर करताना शासनाने दाखवलेले दुटप्पी धोरण पाहून शेतकरी अक्षरशः संतापले आहेत. कारण, जमीन खरेदी–विक्रीच्या वेळी सातबाऱ्यावर विहीर किंवा बोअरची नोंद असल्यास ती जमीन 'बागायती' धरली जाते आणि शासनाकडून जादा स्टँप ड्युटी आकारली जाते. म्हणजे शेतकरी जमीन घेताना जास्त पैसे देतो, कारण जमीन बागायती आहे असं मानलं जातं. पण जेव्हा त्या जमिनीवर पावसामुळे पिकांचं नुकसान होतं, तेव्हा तीच जमीन शासनाच्या कागदोपत्रीत 'कोरडवाहू' म्हणून दाखवली जाते!

हा विरोधाभास पाहून शेतकऱ्यांचा संताप ओसंडून वाहतो आहे. कारण, बागायती जमीन असूनही शासन फक्त १८,५०० प्रति हेक्टर इतकीच मदत देत आहे. प्रत्यक्षात सातबाऱ्यावर विहिरी–बोअरची नोंद असलेल्या जमिनींना 'हंगामी बागायती' म्हणून २७,५०० प्रति हेक्टर मदत मिळायला हवी होती. म्हणजेच प्रत्येक शेतकऱ्याला थेट ९,००० प्रति हेक्टर इतकं नुकसान शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे होत आहे. शेतकऱ्यांनी विहिरी खोदण्यासाठी लाखोंचे कर्ज काढले, पाईपलाइन टाकल्या, मोटारी बसवल्या, शेती बागायती केली. पण जेव्हा पिकं वाहून गेली आणि सरकारकडून मदत अपेक्षित होती, तेव्हा शासन त्यांनाच 'कोरडवाहू' म्हणत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.अतिवृष्टीमुळे आधीच उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमेवर शासनाने मीठ चोळल्यासारखी अवस्था झाली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता नुकसानभरपाईचा तातडीने पुनर्विचार करून न्याय्य दराने मदत द्यावी, अशी एकमुखाने मागणी ग्रामीण भागातून होत आहे.

जमीन घेताना सरकार आम्हाला बागायती म्हणून जास्त स्टँप ड्युटी वसूल करते. पण जेव्हा आमचं नुकसान होतं, तेव्हा तीच जमीन कोरडवाहू ठरवतात! हा कसला न्याय ? सरकार आमचं दुःख समजून घेत नाही.

**–सतिश कदम**
**बाणेगावचे शेतकरी**

आम्ही विहीर खोदली, मोटार बसवली, पिकं घेतली; म्हणजे बागायती जमीन झाली. पण मदतीच्या वेळी कोरडवाहू म्हणतात! सरकारच्या टेबलावर बसणाऱ्यांना आमच्या हक्काचं महत्त्व समजत नाही. शेतकरी जर खचला, तर देश काय उरेल?

**–बद्रीनाथ धबडकर**
**शेतकरी मांदाळा**

## सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत गैरवर्तन करणाऱ्या राकेश केशव नावाच्या वकिलावर कडक कार्यवाही करा – अश्रूबा खरात



**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/**जातीय द्वेषातून सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासोबत राकेश केशव नावाच्या वकिलाने गैरवर्तन केले त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

**सविस्तर पान नं.३ वर...**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813